VOL- VII ISSUE- I JANUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# ग्रंथालय सहकार्य ते ग्रंथालय कंसोरशियम

**प्रा. अनिल शिवाजी पाटील**

ग्रंथपाल बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण

सार:-

माहिती जगतात,ज्ञान युगात रोज नवनवीन माहितीची भर पडत असल्यामुळे ज्ञानविज्ञानाची मोठी वाढ व त्याविषियीचे साहित्य संशोधनासाठी उपलब्ध करून देण्यासाठी सततची मोठी निकड यातुन ग्रंथालाय सहकार्याची गरज निर्माण झाली आहे. "विना सहकार नाही उद्धार" या उक्तीप्रमाणे ग्रंथालयक्षेत्रयास अपवाद असू शकत नाही. ग्रंथालय, प्रलेखनकेंद्र, माहितीकेंद्राचा समाजाला जास्तीजास्त उपयोग झाला पाहिजे, हे ग्रंथलय सहकाराचे साध्य आहे. त्यासाठी देशविदेशात स्थानिक,राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय संस्था निर्माण झाल्या आज अनेकविध ज्ञानशाखाचा उदय होत आहे. सतत वाढत्या वाचनसाहित्याच्या गरजा, माहितीचा स्फोट,ग्रंथालयाकडे असणारा पुरेसा निधी या सर्वांना पर्याय म्हणून ग्रंथालय व माहितीकेंद्रांना आंतरग्रंथालचीन देवघेव वाचनसाहित्याची आदलाबदल,सहकारी तालिकीकरण,सहकारी खरेदी, सहकारी नियतकालीक प्रकल्प,वर्गणी अशा अनेक संदर्भात समन्वयाव्दारे मात करता येईल.

ग्रंथालय सहकार्याची या पुढची प्रगती अवस्था म्हणजे ग्रंथालय कंसोरशियम. परस्पराची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी माहितीकेंद्रांनी,प्रलेखनसंस्थांनीग्रंथालयानी समन्वय,सहकार आणि एकत्रिकरण या माध्यमातुन संघ स्थापन करणे यास कंसोरशिया म्हणतात. या माध्यमातून वेळ,श्रम, व पैसा यांची बचत होते व मिळणारा लाभ एकत्रितपणे समन्वयातून वाटून घेणे. म्हणूनच माहिती तंत्रज्ञानाच्या, नेटवर्किंगच्या युगात ग्रंथालय कंसोरशियाना अनन्यसाधारण महत्व आहे.

---

**प्रस्तावना:-**

आज माहितीच्या युगात वाचकांच्या गरजा मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. केवळ कोणतेही एक ग्रंथालय या वाचकांच्या गरजा पुर्ण करू शकत नाही. म्हणून एकाच विभागात,प्रदेशात असणाऱ्या अनेक ग्रंथालयांनी एकमेकांना सहकार्य करणे फायद्याचे असते.ग्रंथालय साहित्याच्या वाढत्या किंमती,संस्थाकडे असणारा अपूरा निधी यातून ग्रंथालय सहकार्य संकल्पना पुढे आली. ग्रंथप्रदर्शने,चर्चासत्रे,व्याख्याने अशा विविध माध्यमातून ज्ञानलालसा वाढवणे आवश्यक आहे. कोणतेही ग्रंथालय,माहितीकेंद्र ज्ञानसाधनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकत नाही. वाचनसाहित्याची संख्या मोठ्याप्रमाणात वाढली आहे.ही सर्व साधने खरेदी करणे कोणालाही शक्य नाही.आपल्या जास्तीजास्त वाचकांच्या गरजा भागवता आल्या पाहीजेत याकरीता प्रत्येकाला दुसऱ्या ग्रंथालयाचे सहकार्य घ्यावे लागते.ग्रंथालय सहकार्यामुळे आर्थिकबचत होते.वाचकांच्या गरजा भागवता येतात, व चांगली ग्रंथालय सेवा देता येते.

माहितीचा विस्फोट अपूरी साधनसामुग्री,अपूरा निधी यावर मात करण्यासाठी परस्पर सहकार्य ही काळाची गरज झाली, ही गोष्ट ग्रंथालय सहकार्य व कंसोरशियाच्या दृष्टीने महत्वाची आहे. कोणतेही ग्रंथालय केव्हाही स्वयंपूर्ण नसते त्यामुळे इतर ग्रंथालयाकडे धाव घेण्याचे प्रसंग सर्वच प्रकारच्या ग्रंथालयांना येतात "एकमेका सहाय्य करू" या भावनेतून आधुनिक युगात कंसोरशियाची निर्मिती देश-विदेशात व्यापक झाली आहे.

**उद्दिष्टे:-**

१) ग्रंथालय प्रलेखन केंद्राना अधिक सक्षम सेवा देण्याच्या दृष्टीने तयार करणे

२) ग्रंथालय आणि माहिती केंद्रांनी उपलब्ध साधनांच्या माध्यमातून अधिकाधिक उपभोगात्यांच्या गरजा पूर्ण करणे.

३) व्यक्तिगत,साधन,कार्यकृती या माध्यमातून साधन वाटणीची योजना कार्यान्वित करून परस्पर समन्वयातून फायदा मिळवणे.

**ग्रंथालय सहकार्य साधनवाटणीचा इतिहास:-**

ग्रंथालयाच्या इतिहासात ग्रंथालय सहकार्य ही संकल्पना फार प्राचीन आहे. साधारणपणे ख्रिस्तपूर्व २०० वर्षे ग्रंथालय सहकार्य ही संकल्पना अस्तित्वात होती इ.स. २०० साली परगॅमन ग्रंथालयाने अलेक्झांड्रिया ग्रंथालयाशी नाते जोडून वाचनसाहित्याची देवघेव करण्यात आली. प्राचीन भारताच्या इतिहासात मठामधील ग्रंथालयात ग्रंथालय सहकार्य अस्तित्वात होते.इ.स. १७७० मध्ये जर्मनीने ग्रंथालय सहकार कार्यक्रमाची सुरूवात केली १९व्या शतकात अमेरिकेत आंतरग्रंथालयीन सहकाराला सुरूवात झाली.ग्रंथालय व्यवसायात इ.स. १९६० पासून साधनाची वाटणी ही संज्ञा सर्वत्र वापरायला सुरूवात झाली, आलीकडे माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालय सहकारापासून उगम झालेली संकल्पना १९७०-१९८० या दशकात साधन वाटणी या शब्दाने व्यापक झाली पुढे १९९० च्या दशकात हीच संकल्पना कंसोरशियाच्या रूपाने अधिक व्यापक झाली आहे. आता माहिती तंत्रज्ञान व नेटवर्किंगच्या युगात कंसोरशिया संकल्पना माहिती स्त्रोताचा राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय हब झाला आहे.

**सहकार्याचे व साधनवाटणीचे कार्यक्षेत्र:-**

ग्रंथालय माहितीकेंद्रे सहकार्यातून साधनसामग्रीचा उपयोग ग्रंथालय जाळे. आंतरग्रंथालयीन देवघेव,भागीदारी कार्यपद्धतीतून ग्रंथालय वाचकांना कार्यक्षम ग्रंथालय सेवा देता येते. वाचन साहित्याचे उपार्जन,खरेदी,उपस्कार आणि संस्करण इत्यादी कार्ये पार पाडली जातात. वाचनसाहित्याचे संग्रहण करणे, ग्रंथोपार्जन, सहकारी साठवण,सहकारी प्रक्रिया, संघतालिका, सहकारी सेवांचे देवघेव,व्यक्तीची अदलाबदल व प्रशिक्षण,विअरिंग हाऊस,भाषांतर सेवा,मनुष्यबळ, आर्थिक व तांत्रिक साधनाचे केंद्रीकरण करणे, डेटाबेस तयार करणे, ग्रंथालय व माहिती साधनासाठी निधी निर्माण करणे.ही ग्रंथालय सहकार्य साधनवाटणीची कार्यक्षेत्रे आहेत.

**सहकाराचे नियोजन व कार्यपद्धतीची अंमलबजावणी :-**

प्रत्येक ग्रंथालय व माहितीकेंद्राने आपल्या उपयोगाच्या गरजाचा आपल्याकडे असणारी साधनसंपत्ती याचा विचार करून अभ्यासक वाचकांच्या अधिक गरजा पूर्ण करणारी कार्यपद्धती निर्माण करावी. आपल्या जमेच्या व उणिवांचा अभ्यास करावा अधिकाधिक वाचकांच्या गरजा पूर्ण करून देणारी कार्यपद्धती,कमीतकमी खर्चात सर्वोत्तम साहित्य देणारी निर्माण करणे गरजेचे आह. आपल्या ग्रंथसंग्रह विकासाचे दिर्घकालिन धोरण तयार करावे त्या करिता उद्दिष्टे निश्चित करावित,निश्चित कार्यपद्धतीचा मसुदा तयार करावा, व कार्यपद्धतीची अंमलबजावणी करावी.

सर्व सहभागी ग्रंथालयानी आपल्या ग्रंथालयाचा सर्वोत्तम वापर करण्याच्या दृष्टीने विविध बाबीची पुर्तता करणे आवश्यक आहे.प्रत्येक सहभागी माहितीकेंद्राने सहभागी उपयोग करण्याची मानसिकता प्रथमतयार करावी.वाचनसाहित्य व माहितीस्त्रोताचा डेटाबेस तयार करणे, आपल्याकडे असणाऱ्या उपभोगत्याच्या मागणी व गरजांचा अभ्यास करावा. सहकार व कंसोरशियाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आधुनिक माहिती तंत्रज्ञान,नेटवर्क्स प्रभावी साधने तंत्रे यांचा वापर करावा. सहकारीची योजना कार्यान्वित करणारा आराखडा तयार करावा.तसेच याकरिता कार्यक्षम व प्रशिक्षित सेवकवर्ग असावा.

प्रत्येक सहभागी ग्रंथालयाने परस्पर सहकार्यासाठी निवडलेल्या कार्यपद्धतीची जबाबदारी स्विकारावी व त्या प्रमाणे आपलेकडील वाचनसाहित्य संदर्भासाठी मध्यवर्ती दालन सर्वांसाठी खुले ठेवावे. या प्रमाणे सहकारी तत्वावर कार्य करता येईल.

**आंतरग्रंथालयदेवघेव सेवा:-**

आपल्या वाचकांना हवा असणारा ग्रंथ कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहे त्याचा शोध घेवून तो ग्रंथ उसनवारीने आपल्या ग्रंथालयात आणने व आपल्या वाचकांच्या जास्तीजास्त गरजा पूर्ण करण्यासाठी आंतरग्रंथालयीनदेवघेव सुविधा उपलब्ध करून देणे सहकारी तत्वावर वाचकांना ग्रंथालयीन माहितीसेवा व संदर्भ सेवाखुली करणे. त्यासाठी सहभागी ग्रंथालयांनी किमान आणि समान नियमावली तयार करणे व ग्रंथदेवघेवीची कार्यपद्धती ठरवणे ऑनलाईन सुविधेमुळेनेटवर्कमुळे विविध ग्रंथालयातील ग्रंथांचा शोध घेता येतो त्यामुळे अधिकाधिक वाचकांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करता येतात.

**आंतरग्रंथालयवाचक सुविधा:-**

आंतरग्रंथलयीन देवघेव सुविधेमध्ये प्रत्येक ग्रंथालयाचे महत्व व ग्रंथालयाची जबाबदारी व्यापक झाली आहेत. यामध्ये प्रत्येक ग्रंथालयाच्या वापरासाठी वाचकासाठी समान असे आंतरग्रंथालय वाचक कार्ड तयार करावे त्यांच्याकडून ग्रंथाच्या वापरासंबंधी अनामत रक्कम व वार्षिक फी घ्यावी. या कार्डवर संबंधीत वाचकाला सर्व सहभागी ग्रंथालयातून आवश्यक ते ग्रंथ घेतात, ग्रंथालय सभासद कार्ड देताना नियमांची माहिती व हमीपत्र भरून घ्यावे.आंतरग्रंथालय वाचक सुविधेमध्ये नियमांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक आहे. माहितीचा विस्फोट अपुरी संसाधने,अपुरे मनुष्यबळाची कमतरता यास पर्याय म्हणून आंतरग्रंथालय वाचक सुविधा निर्माण करून आधिकाधिक ज्ञानाची गरज पूर्ण करता येते.

**ग्रंथालय जाळी:-**

ज्ञानाचा विस्फोट,माहितीची वाढती गरज,मर्यादित पैसा,कर्मचाऱ्यांच्या मर्यादा ग्रंथालय साधने,तंत्रे व संपर्क साधनांची कमतरता याला पर्याय म्हणून सहकारातून अनेक मार्ग विकसित झाले आहेत. ग्रंथालय साधनांचा सहभागी उपयोग करण्यासाठी ग्रंथालय जाळे हा ग्रंथसूचीय नियंत्रणासाठी व माहिती संप्रेक्षणासाठी प्रभावी मार्ग आहे या मध्ये संगणकाच्या माध्यमातून ऑनलाईन माहितीची देवाणघेवाण करता येते. भारतात अशी अनेक राष्ट्रीय,प्रादेशिक,स्थानिक जाळे निर्माण झाली आहेत.

उदा. Inflibnet, Punenet, Bonet, Delnet.

**भारतातील ग्रंथालय सहकार व ग्रंथालय जाळी:-**

भारतात अनेक राष्ट्रीय,प्रादेशिक ग्रंथालय जाळी निर्माण झाली आहेत. उदा. इन्सडॉक,नॅशनल सायन्स लायब्ररी, नॅशनल मेडिकल लायब्ररी, इंडियन ॲग्रीकल्चर रिसर्च इन्स्टिट्युट,डेसिडॉक,बार्क, आय एस आय लायब्ररी, स्पेशल सायन्स डॉक्युमेंटेशन सेंटर, याशिवाय निसाटची विविध माहिती केंद्रे,लेदर टेक्नालॉजी,फुड टेक्नालॉजी,मशीन टूल्स अहमदाबाद, टेक्स्टाईल ॲन्ड अलाईड इंडस्ट्री,केमिकल इंडस्ट्री,किस्टलोग्रॉफी, डेलनेट,बोनेट, मॅलिबनेट, ॲडीनेट, हॅलिबनेट, पुणेनेट,इंडियन इंस्टिट्युट ऑफ ॲस्ट्रॉफिजिक्स लायब्ररी, इन्टर युनिव्हरसिटी सेंटर ऑफ ॲस्ट्रॉनॉमी आणि ॲस्ट्रॉफिजिक्स लायब्ररी,टाटा इन्स्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्च लायब्ररी, फिजिक्स रिसर्च लॅबोटरी लायब्ररी,नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्राफिजिक्स लायब्ररी अशी विविध ग्रंथालय जाळी कंसोरशिया भारतात कार्यक्षमतेणे चालू आहेत. त्यामुळे कमी वेळात अधिक माहिती मिळू शकते.

**आंतरराष्ट्रीय ग्रंथालय सहकार व ग्रंथालय जाळी:-**

आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकाराच्या भावनेतून माहितीकेंद्राची जाळी निर्माण झाली आहेत. उदा. जागतीक स्तरावर,जागतीक ग्रंथसूची नियंत्रणसाठी प्रयत्न झाले आहेत आंतरराष्ट्रीय सहकार व ग्रंथसूची नियत्रंणासाठी युनेस्को,एफआयडी,इफला,आयएसओ,युनिसिस्ट,इनिस,ॲग्रीस या संस्था कार्य करत आहेत. अमेरिकन नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनने वैद्यकशास्त्रातील जागतीक ग्रंथसूचीय नियंत्रण मेडलॉर्स ही जागतीक वैद्यकशास्त्राची माहितीसेवा. वर्ड हेल्थ ऑर्गनायझेशन,नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन ही अनेक ग्रंथालय माहिती केंद्रे व नेटवर्क्स मधून मोठ्याप्रमणात सहकाराच्या माध्यमातून माहितीची देवाणघेवाण व संप्रेक्षण होत आहे.

अमेरिकेतील हाबर्ड,येल आणि कोलंबिया विद्यापिठाने १९७२ साली रिसर्च लायब्ररी ग्रुप या नावाचा संघ स्थापन केला होता.अमेरिकेत ऑनलाईन कॉलेज लायब्ररी सेंटर ही संस्था तेथील अनेक ग्रंथालयांना एकत्र करून ना नफा या तत्वावर कार्य करून ग्रंथालय संसाधन व सेवाची वाटणी करत होती या शिवाय इलियन्स लायब्ररी इंनफोरमेशन नेटवर्क न्यु इंग्लड लायब्ररी इन्फोरमेशन नेटवर्क, मिडवेस्टर्न रिजनल लायब्ररी नेटवर्क इत्यादी कंसोरशिया सहकारी तत्वावर अनेक ग्रंथालयाची सेवा देत आहे. जॉईंट ॲकेडमिक नेटवर्क कंसोरशिया इंग्लड, ऑस्ट्रेलियन इन्फॉमेशन नेटवर्क ऑस्ट्रेलिया ही आंतरराष्ट्रीय जागतीक कंसोरशियाची उदाहरणे आहेत.

**कंसोरशियाची आवश्यक्ता:-**

ग्रंथालय कंसोरशियाचा प्रमुख हेतू साधनसामुग्रीच्या वाटणीत सहभागी होणे हा आहे. कंसोरशियाच्या माध्यमातून ग्रंथालयाच्या विविध आडचणीवर मात करणे, उपाययोजकांच्या वाढत्या मागण्या पुर्ण करणे, पुस्तके व

नियतकालीकाच्या वाढत्या किंमीवर मात करणे आपल्या उपभोगत्यांना नियमित अद्यावत माहिती उपलब्ध करून देणे वेळ,श्रम,पैसा यांची बचत करणे.

**कंसोरशियाचे क्षेत्र:-**

आयसीटी साधनाचे अंकीय ग्रंथालय,ऑनलाईन वर्तमानपत्रांची कात्रण सेवा,ई-जनर्ल्स सबक्रिप्शन्स,ई-ग्रंथालय यांत्रीकीकरण ग्रंथालय नेटवर्की ग्रंसंघतालीका ही ग्रंथालय कंसोरशियाची प्रमुख क्षेत्रे आहेत

**कंसोरशियाच्या निर्मितीतील समस्या:-**

कंसोरशियामध्ये ग्रंथाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होते. स्थानिक स्वातंत्र्यावर आघात,संपर्क साधनाचा आभाव,दोन ग्रंथालयातील अंतर,नेतृत्वगुणांचा अभाव,जादा कामाची बोजा,परस्परातील हेवा किंवा वितुष्ट इत्यादी अनेक करणानी सहकाराच्या तत्वाला फाटे फुटतात. आज प्रत्येक ग्रंथालयामध्ये सहकार्य करण्याच्या इच्छाशक्तीची आवश्यक्ता आहे. अनेक ग्रंथालय व माहितीकेंद्रे आजही प्राथमिक आवस्थेत आहेत. त्यांच्याच वाचकांना सेवा देण्यास त्यांना आडचणी असतात अशा परिस्थितीत बाहेरिल माहितीकेंद्रांना,अभ्यासकांना मदत देण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते.

**कंसोरशियाचे महत्व:-**

बहुव्यापी ग्रंथसंग्रह निर्माण होतो,डेटाबेस निर्मिती,आंतरग्रंथालयीन देवघेवीमुळे पुस्तक, मासिके इत्यादीच्या प्रती मिळतात. आंतरग्रंथालयीन देवघेवीमुळे कालिकातील लेखाच्या प्रति मिळतात. साधनांच्या वाटणी मधून इंटरनेट ग्रंथालय डेटाबेस तयार होतो. उपयोजकाच्या विविधतापूर्ण माहितीच्या गरजा पूर्ण होतात. वेळ,श्रम,पैसाव मनुष्यबळाची बचत होते.

आज माहितीयुगात विज्ञान व तंत्रज्ञानात अत्यंत वेगाने बदल होत आहे. अशा परिस्थितीत माहितीचा विस्फोट,नित्य नविन संशोधन,नियतकालिकांच्या वाढतया किंमती,नियतमालीकाच्या वर्गणीचे वाढते दर,अपुरा निधी,अपुरा सेवकवर्ग,तज्ञ,अनुभवी,तांत्रीक मनुष्यबळाची कमतरता,आधुनिक इलेक्ट्रॉनिक व अंकीय माहिती साधने अचूक व तत्पर सेवेची आवश्यक्ता इत्यादीमुळे सहकारी भागीदारी तत्वे कंसोरशिया अपरिहार्य ठरत आहे. सहकारी भागीदारी ज्ञानसाधन केंद्रं होतील. देशाची भावीपिढी ज्ञानी व सुजान घडवण्यास मदत होईल.

आज माहिती केंद्रांना अचूक व तत्पर सेवेची गरज आहे.अशावेळी सहकारी भागीदारी तत्व अपरिहार्य ठरते आहे. सहकार्यातून कंसोरशियाच्या माध्यमातून वाचकांना निश्चित दर्जेदार सेवा देता येतो म्हणून आज प्रत्येक ग्रंथालयांनीआपले विशिष्ट वाचक,विशिष्ट सेवा,विशिष्ट साधने या पलिकडे जाऊन आपली संसाधने खुली केली पाहीजे.

**संदर्भ पुस्तके:-**

१) कोन्नुर, एम.बी. संपा, २००८ ग्रंथालय आणि माहितीशास्त्रकोश, पुणे,डायमंड प्रकाशन.
२) नरगुंदे, रेवती: २००२ ग्रंथालय आणि सामाजिक विकास, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.
३) फडके, द.ना. : २००७ ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, पुणे युनिव्हर्सल प्रकाशन.
४) लेले वसंत नि : २०१२ ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील विविध पैलू पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.
५) महाजन, शा. ग. : १९९५ ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, पुणे: डायमंड प्रकाश.
६) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, शालेय ग्रंथालय: ग्रंथालय सेवा व उपक्रम, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ.